नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **१३/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **निल यशवंत पाटील** |
| वय सुमारे | : | १८ वर्षे, व्यवसाय : शिक्षण |
| निवासस्थान | : | मु. धोकवडे भाग–१, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

माझे काका रवि लक्ष्मण पाटील यांचे चोंढी गावाच्या हद्दीत मोटरसायकल दुरुस्तीचे गॅरेज आहे. मी तेथे अधूनमधून काम शिकण्यासाठी जात असतो. दि. ०८/१२/२०२४ रोजी सायं. ०५:३० वाजताच्या सुमारास गॅरेजच्या बाहेरील शेडमध्ये काम करत होते. त्यावेळी अलिबाग बाजूकडून रेवसकडे जात असलेली निळ्या रंगाची बी.एम्.डब्ल्यू. कंपनीची कार क्र. एम्.एच्. ०६ बी ई २०० ही गाडी गॅरेजच्या शेडमध्ये घुसली. तेथे काम करत असलेले माझे काका रवि पाटील व मशिन रिपेअर करण्यासाठी आलेले मंगेश म्हात्रे व सोनू नाईक यांना गाडी येवून आदळली. मी गॅरेजमध्ये काम करत होतो व पाने आणण्यासाठी काकांनी मला आत पाठविले होते. अपघात झाल्यावर आम्ही सर्व तेथे जमलो. आम्ही अपघातातील जखमींना अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये नेले. बी.एम्.डब्ल्यू. कारचा चालक संदीप गायकवाड होता. तो गाडीमधून बाहेर आला तेव्हा त्याच्या तोंडाला दारुचा वास येत होता. अपघाताचा आवाज आल्यानंतर मी बाहेर आलो होतो व मी पाहिले की, मशिन रिपेअर करण्यासाठी आलेले सोनू नाईक व मंगेश

म्हात्रे यांचे पाय गाडीच्या मध्ये अडकलेले होते व काका गाडीच्या खाली होते. संदीप गायकवाड गाडी चालक हा गाडीमधून बाहेर आला. मी व जमलेल्या लोकांनी काकांना गाडीच्या खालून काढले. गाडीमध्ये संदीप गायकवाड हे एकटेच होते.

०२. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो होतो व फिर्याद दिली. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १४** देण्यात येते. मी संदीप गायकवाड याला पाहिल्यास ओळखू शकेन. तो आज न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आरोपीला ओळखले. पोलीसांनी दुसऱ्या दिवशी घटनास्थळाचा पंचनामा केला होता. घटनास्थळ डेअरी फार्मच्या समोरील आमचे गॅरेज होते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत** :

०३. आता मी १२ वी मध्ये शिकत आहे. घटना घडली त्यावेळी मी अकरावीमध्ये होतो. मी बाणा हायस्कूल, आवास येथे शिकत होतो. मी सकाळी ७.३० वाजता कॉलेजमध्ये जात होतो व ११.३० वाजता परत येत होतो. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्म म्हणून दुकान आहे डेअरी फार्म म्हणून नाही. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मला रस्त्यालगत दगड, रेती, सिमेंटने बांधलेली भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मची भिंत व रस्ता यामध्ये माझ्या काकांचे गॅरेज आहे.

०४. हे म्हणणे खरे आहे की, गॅरेजमध्ये रिपेअरींगसाठी आलेल्या गाड्या रस्त्यावरही लावलेल्या असतात. साक्षीदार सांगतो की, त्या शेडमध्ये लावलेल्या असतात. हे म्हणणे खरे आहे की, ज्या रस्त्यावर घटना घडली तो रस्ता अलिबाग–रेवस व अलिबाग–मांडवा येथे जाणारा मोठा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्यावर वाहनांची नेहमी वर्दळ असते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, या केसमधील साक्षीदार रविंद्र लक्ष्मण पाटील, विशांत मांजरेकर यांच्याशी माझी ओळख आहे. जयंत, मंगेश यशवंत म्हात्रे, सोनू नाईक यांच्यशी माझी ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे काका स्वत: मेकॅनिक म्हणून काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी अधूनमधून गॅरेजमध्ये शिकण्यास येत होतो. धोकवडे ते चोंढी यामधील अंतर ०८ कि.मी. आहे. माझ्या घरातील माझे वडील यशवंत, काका रविंद्र यांच्या कुटुंबातील शिकलेली व्यक्ती मी आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, जखमी साक्षीदार मंगेश म्हात्रे, सोनू नाईक यांचा हॉस्पीटलचा खर्च संदीप गायकवाड याने केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला या घटनेमध्ये मार लागला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली त्यावेळी मी घटनास्थळी नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कुटुंबातील शिकलेली व्यक्ती असल्याने काकांच्या कुटुंबियातर्फे खोटी फिर्याद दिली. मी पोलीसांना सांगितले होते की काकांनी मला पाने आणण्यासाठी आत पाठविले होते. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताचा

आवाज आल्यानंतर मला समजले की, अपघात झालेला आहे. मला दारुच्या प्रकाराबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन आरोपीच्या तोंडाला दारुचा वास येत होता असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या तोंडाला दारुचा वास येत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताबाबत काहीही माहिती नसताना मी खोटी फिर्याद दाखल केलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२५/०८/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **३२/२०२५**
निशाणी क्र. **१७/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विनायक सुरेश गुरव** |
| वय सुमारे | : | ४४ वर्षे, व्यवसाय : वाहनचालक |
| निवासस्थान | : | मु. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. ०९/१२/२०२४ रोजी मला पोलीसांनी बोलावले होते. अपघाताबाबतचा पंचनामा करायचा होता. रेणुका स्टोअर्सच्या बाजूला अपघात झाला होता. रेणुका स्टोअर्सच्या बाजूला गॅरेज आहे त्या गॅरेजमध्ये अपघात झाला होता. ते बाईकचे गॅरेज आहे. पंचनाम्याची वेळ मला आता आठवत नाही. मला पंचनामा दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला वाचून दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी—२** म्हणजेच **निशाणी क्र. १८** देण्यात येते. **सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. डी.बी. राणे यांचेमार्फत</u>** :

०२. मला मराठी वाचता येत नाही. पोलीसांनी घटनास्थळी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजूलाच लागून मोठा फार्म हाऊस आहे. हे म्हणणे खरे आहे की, डे फार्मच्या रोडला लागून मोठी दगडी भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दगडी भिंत व रस्त्याच्या मध्ये गॅरेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, दगडी भिंतीला लागून डे फार्ममध्ये

जाण्यासाठी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या बाजूला वडाचे मोठे झाड आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या उत्तरेला विशाल मांजरेकर यांचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा रस्ता अलिबाग–रेवस, अलिबाग–मांडवा येथे जातो. हे म्हणणे खरे आहे की, या रस्त्यावर दिवसभर जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्यावर भरपूर वाहने येत जात असतात.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मला थांबण्यासाठी चोंढी नाका आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वाहनचालक असल्यामुळे चोंढी नाक्यावर थांबलेला असतो. हे म्हणणे खरे आहे की, चोंढी नाक्यावर परहुरपाड्यातील पाटील यांचे दुकान आहे व ते चांगले चालते. हे म्हणणे खरे आहे की, बहुतांश लोक त्या दुकानामध्ये थांबलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, पाटील व रविंद्र लक्ष्मण पाटील गॅरेजवाले यांचे नाते आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी तयार पंचनाम्यावर सही घेतली. मी निल यशवंत पाटील याला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, निल पाटील, रविंद्र पाटील यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०६/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.